# जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, नागपूर यांचे कार्यालय,
# सेमिनरी हिल्स, वायुसेनानगर, बॉटनीकल गॉर्डन समोर, नागपूर-06 (महाराष्ट्र)

0712-2511621 Email ID:- nagpurddcah@gmail.com

## द्रवनत्र वाहतुक दरकरार दिनांक 1 ऑक्टोबर 2025 ते 30 सप्टेंबर 2026 साठी नियम व अटी

1) संपुर्ण द्रवनत्र व द्रवनत्रपात्रांच्या वाहतुकीकरीता दरकरार प्रक्रिया ही दोन लिफाफा (तांत्रिक व व्यापारी ) पध्दतीचा अवलंब करुन पार पाडण्यात येईल व दरकरार संबंधी संपुर्ण सुचना, नियम व अटी या कार्यालयाचे सूचना फलकावर व पशुसंवर्धन विभागाचे संकेत स्थळ https://dahd.maharashtra.gov.in वर दि. 1/09/2025 पासून पाहावयास उपलब्ध राहील.

2) दरकरार अर्ज तसेच नियम व अटी या कार्यालयाकडून प्राप्त होतील. अर्जा सोबत अनामत रक्कम रु 10,000/- (दहा हजार रुपये ) ही धनाकर्षाद्वारे (Demand draft) भरणा करावी लागेल. सदरची रक्कम रोखीने स्विकारली जाणार नाही.

2) दरकरार प्रक्रियेत भाग घेणाऱ्या कंत्राटदारासमोर अथवा त्यांचे प्रतिनिधीच्या उपस्थितीत दरकरार समिती समोर दरपत्रके उघडण्यात येईल व दरकरार समितीचा निर्णय अंतिम व निविदाधारकांवर बंधनकारक राहील.

4) कंत्राटदाराने तांत्रिक लीफाफ्यामध्ये आपल्या वाहनाची साक्षांकित केलेली कागदपत्रे (उदा.वाहन नोंदणी प्रत, वाहन रस्ता कर पावती, वाहन वाहतुक फिटनेस प्रमाणपत्र, पीयुसी प्रमाणपत्र, ईन्शुरन्स प्रमाणपत्र, सामान वाहतूक परमीट ईत्यादी), साक्षांकित केलेली अटी व शर्ती, प्रतिज्ञापत्र, चेक लिस्ट, स्वतःचे आधार कार्ड, पॅन कार्ड सादर करावयात.

5) तांत्रिक लिफाफा निविदा उघडण्याचे दिवशी व्यापारी लिफाफा उघडणेपूर्वी उघडण्यात येईल व सर्व कागदपत्रांची पूर्तता व पडताळणीअंती योग्य असणाऱ्या कंत्राटदाराचीच व्यावसायिक निविदा उघडण्यात येईल.

6) तसेच दरपत्रक उघडण्याचे दिवशी समिती सभेच्या वेळी सर्व कागदपत्रांच्या मुळ प्रती सोबत एक साक्षांकित प्रत पडताळणी करीता सादर करावयात.

7) वाहतुकीसाठी वापरण्यात येणारे वाहन ऊन, वारा, पाऊस यापासून द्रवनत्रपात्रे सुरक्षित राहतील याकरिता हुड ठेवणे बंधनकारक राहील व वाहनास द्रवनत्रपात्राखाली रबर मॅटीन लावावे लागेल. द्रवनत्र वाहतूक व पुरवठयाकरीता वापरण्यात येणारे वाहन हे सुस्थितीत व खरेदी 10 वर्षाचे आतील असावी. तसेच वाहनाची क्षमता 1.7 मे. टन. किंवा त्यापेक्षा जास्त असावी व एका वेळी कमीतकमी 18 द्रवनत्रपात्रे (50 लिटर क्षमतेचे) वाहून नेण्याची क्षमता असणे आवश्यक आहे. जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय यांचे आदेशान्वये आवश्यक तेवढे अतिरिक्त द्रवनत्रपात्र वाहून नेण्याची क्षमता असावी. ज्यादाचे द्रवनत्रपात्र वाहतुक करावयाची आवश्यकता भासल्यास दरकरारीत वाहनामध्ये लाकडी फळ्या लावून दुसरा मजला तयार करून द्रवनत्रपात्रे सुरक्षितपणे वाहतुक करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

8) दरपत्रके उघडण्याचे दिवशी दरकरार समिती समोर तपासणीसाठी वाहन ठेवावे, समिती यावर अंतिम निर्णय घेईल.

9) द्रवनत्रपात्र वाहतुकीच्या वेळेस गाडीचा वेग दर ताशी 30 ते 35 किमी पेक्षा जास्त राहु नये. जास्त वेगाने गाडी नेल्यास होणा-या नुकसानाच्या भरपाईची जबाबदारी वाहतूक कत्रांटदारावर राहील.

10) वाहनामध्ये चालकाचे जवळ दोन व्यक्ती बसण्याची व्यवस्था असावी. वाहतुकीच्या वेळेस कार्यालयाचे एक किंवा दोन प्रतिनिधी सोबत राहतील. कार्यालयीन प्रतिनीधी उपलब्ध नसल्यास वाटपाची संपुर्ण जबाबदारी आपल्याला सांभाळावी लागेल.

11) वाहन वाहतुकीच्या सेवेत असतांना वाहनाची हलचल वाहनासोबत असलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या आदेशाप्रमाणे करावी लागेल. वाहनात खाजगी सामान किंवा इतर प्रवाशांची वाहतुक करता येणार नाही. तसेच वाहनचालक यांची वर्तणुक चांगली असावी, दारू पिवून वाहन चालवू नये तसे केल्यास मंजुर झालेला दरकरार खंडीत करण्याचे अधिकार कार्यालय प्रमुखांना राहतील.

12) वाहनात द्रवनत्र चढविणे, उतरविणे व उपकेंद्रापर्यंत पोहचविण्याची व्यवस्था कंत्राटदाराला करावी लागेल. तसेच द्रवनत्राचे टॅकर आल्यानंतर कार्यालयातील द्रवनत्रपात्रे कंत्राटदाराला भरावी लागेल. त्याकरिता वेगळा दर आकारता येणार नाही. तसेच रात्रीच्या मुक्कामाचा वेगळा दर आकारता येणार नाही.

13) द्रवनत्र वाहतुकीचे मार्गावर कृत्रिम रेतन उपकेंद्राचे / पशुवैदयकीय दवाखान्याचे शासकीय सामान विनामुल्य वाहतुक करणे बंधनकारक राहील.

14) द्रवनत्र वाहतुकीच्या वेळेत पथकर / टोलटॅक्स व इतर शासकीय सर्व टॅक्स वाहतुक कंत्राटदारास दयावा लागेल.

15) ज्या कंपनी सोबत महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाव्दारे द्रवनत्र खरेदीचा भावबंद करार होईल त्या ठिकाणाहुन द्रवनत्र उचल करावी लागेल. मध्यप्रदेश किंवा इतर राज्यातुन द्रवनत्र व जनावरे आणण्याकरिता आंतरराज्य परिवहन अधिका-याचे लायसन्स / परमिट प्राप्त करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. अत्यावश्यक आणीबाणीच्या परिस्थीतीत द्रवनत्र महाराष्ट्र किंवा इतर राज्यातील अन्य कंपनीकडुन आणावे लागेल.

16) द्रवनत्र पुरवठयाकरिता ज्या ज्या वेळी हे कार्यालय मागणी करेल त्या त्या वेळी कंत्राटदारास वाहन पुरवठा करणे बंधनकारक राहील, जर नमुद वेळेत वाहन पुरवू शकले नाही तर हे कार्यालय बाजारात उपलब्ध असलेल्या दराने वाहन मागवून द्रवनत्र पुरवठा करेन व दरामधील फरक वाहतुक कंत्राटदाराकडुन वसुल करण्यात येईल. वाहन पुरविण्यास वारंवार खोळंबा झाल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

17) द्रवनत्र पुरवठा हा प्रत्येक मार्गावरील उपकेंद्रावर वेळेवर होण्याचे दृष्टिने वाहन या कार्यालयात पुर्वसुचनेनुसार सुचित केलेल्या वेळेवर आणावे लागेल. वाहनाचे मीटर चालु असणे आवश्यक आहे. काही कारणास्तव मीटर बंद झाले तर त्वरित दुरूस्त करुन घ्यावे लागेल व त्या कालावधीपर्यंत प्रत्येक मार्गाचे असलेले ठराविक कमीत कमी अंतराचे देयक मंजुर करण्यात येईल.

18) 1 ऑक्टोबर 2025 ते 31 सप्टेंबर 2026 या कालावधीत इंधन व ऑईल इत्यादीचे दरवाढ झाली तरी मंजुर निविदा दरात कोणतीही दरवाढ मिळणार नाही.

19) ज्या वाहतुकदाराचे दरपत्रक मंजुर होईल त्यास मंजुरी आदेश प्राप्त झाल्यानंतर त्या दिवसापासुन सात दिवसाचे आत पुर्ण वर्षाच्या वाहतुकीच्या संभाव्य देय रकमेच्या तीन टक्के रक्कम धनाकर्षाद्वारे (डिमांड ड्राफ्ट) सुरक्षा ठेव म्हणुन या कार्यालयात भरावी लागेल व रितसर रू. 500/- च्या स्टॅंप पेपरवर करारनामा लिहुन दयावा लागेल.

20) ज्यांचे दरपत्रक मंजुर होणार नाही त्यास दरपत्रकासोबत भरलेली अनामत रक्कम परत करण्यात येईल व ज्यांची दरपत्रक मंजुर होईल त्यास तीन टक्के सुरक्षा ठेव रक्कम भरल्यानंतरच अनामत रक्कम परत करण्यात येईल.

21) दरपत्रक मंजुर /नामंजुर करण्याबाबतचा अंतिम निर्णय तसेच दरपत्रक संबंधिच्या कोणत्याही बाबींचा अंतिम निर्णय प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचा राहील.

22) खात्याचे अनुदान प्राप्त झाल्यानंतरच वाहतुकीच्या देयकाची रक्कम देयक सादर केल्यापासुन शक्यतो पंचेचाळीस दिवसाचे आत अदा करण्यात येईल.

23) आयकर अधिनियम 1961 सेक्शन 184-सी अन्वये कंत्राटदाराचे दर महिन्याचे देयकातुन 2% टीडीएस रक्कम कपात केली जाईल किंवा आयकर अधिनियमाप्रमाणे वेळोवेळी होणा-या बदलानुसार कपात करण्यात येईल.

24) कंत्राटदारास कोणत्याही प्रकारची आगाऊ रक्कम अथवा अग्रिम देण्यात येणार नाही. तसेच कंत्राटदाराला कोणत्याही प्रकारची अट कार्यालयावर लादता येणार नाही.

25) कार्यालयाच्या लेखी आदेशान्वये द्रवनत्र पुरवठा करणारे वाहन नेमुन दिलेल्या कामाव्यतिरिक्त कार्यालयाचे अन्य कामाकरिता जिल्हयाबाहेर किंवा राज्याबाहेर न्यायचे झाल्यास मंजुर वाहतुक दरानुसार दर आकारण्यात येईल.

26) कंत्राटदारास मान्य दराने द्रवनत्र व वीर्यमात्रा वाहतुक करण्याव्यतिरिक्त पशुसंवर्धन खात्याचे लसमात्रा, वैरण बियाणे, औषधी व विभागीय व्यवस्थापक, अतिशित विर्यमात्रा प्रयोगशाळा, नागपूर या कार्यालयातील द्रवनत्र व विर्यमात्रा व इतर आवश्यक शासकीय साधन सामुग्रीची वाहतुक मंजुर वाहतुक दरानुसारच करावी लागेल.

27) दिनांक 30 सप्टेंबर 2026 नंतर अत्यावश्यक प्रसंगी दरकरारास काही तांत्रिक व प्रशासकीय अडचणीमुळे मंजुरी प्राप्त झाली नाही तर पुढील तीन महीने पुर्वीच्याच मंजुर दराने वाहतुक करावी लागेल.

28) दरपत्रके भरतांना निविदा धारकास नियम व अटी संपूर्ण वाचुन व त्या समजावून घेऊन, त्या पूर्ण मान्य आहे असे समजून त्यावर स्वाक्षरी करणे बंधनकारक आहे.

29) मंजुर कंत्राटदाराकडून एक व्यक्ति नेमून द्रवनत्र पात्रामध्ये द्रवनत्र भरण्याकरीता त्यास द्रवनत्र पुरवठादार कंपनीचे ठिकाणी किंवा कार्यालयात तसेच वाहतुक गाडीमधुन दवाखान्यातील द्रवनत्र पात्रामध्ये नेऊन टाकणे बंधनकारक राहील.

**जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय**
**नागपूर.**

वरील सर्व नियम व अटी मला मान्य आहेत.

**कंत्राटदाराची स्वाक्षरी**
**कंत्राटदाराचे नाव व पत्ता.**

# जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, नागपूर यांचे कार्यालय,
## सेमिनरी हिल्स, वायुसेनानगर, बॉटनीकल गॉर्डन समोर, नागपूर-06 (महाराष्ट्र)

0712-2511621 Email ID:- nagpurddcah@gmail.com


जाक्र : जि.प.उ.आ./जिकृरेकें/तां/ द्र. वाह. दरपत्रक/ /2025 दि.

दरपत्रक सूचना

मालवाहतूक करणाऱ्या कंत्राटदारांना याद्वारे सूचित करण्यात येते कि, जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय नागपूर हे महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने दि. 1 ऑक्टोबर 2025 ते 30 सप्टेंबर 2026 या कालावधीकरीत जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, नागपूर येथून भरलेली द्रवनत्रपात्रे सोबत घेऊन त्याचा नागपूर जिल्ह्यातील उपकेंद्रांना दि. 1 ऑक्टोबर 2025 ते 30 सप्टेंबर 2026 या कालावधीत द्रवनत्र व विर्यमात्रांचा पुरवठा करावयाचा आहे. त्याकरिता ईच्छूक वाहतूकदाराकडून मोहोरबंद दरपत्रके वाहतूक दर प्रति किलोमीटर प्रमाणे द्यावा त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

1) मालाचा तपशील – द्रवनत्र वायु (स्फोटक नसणारे)
2) नागपूर ते जिल्ह्यातील उपकेंद्रांना पुरवठा करणेकरिता लागणाऱ्या द्रवनत्रपात्रांची वाहतुक कमीतकमी 18 द्रवनत्रपात्रे (50 लिटर क्षमतेची) 16" व्यास असलेली एकाच वेळी नेण्याची क्षमता असलेले वाहन
3) नागपूर ते जिल्ह्यातील उपकेंद्रांना पुरवठा करणेकरीत दिलेल्या केंद्रांचे अंतरासाठी करावा लागणार मासिक प्रवास अंदाजे 1500 ते 3000 किमी.
4) निविदेचा कार्यकाळ - दि. 1ऑक्टोबर 2025 ते 30 सप्टेंबर 2026 या कलावधीकरीत
5) निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ - 10 सप्टेंबर 2025 वार बुधवार संध्याकाळी 5.00 वाजेपर्यंत
6) निविदा उघडण्याची तारीख व वेळ दि. 12 सप्टेंबर 2025 दुपारी 12.00 वाजता

(अ) दरकराराबाबत नियम व अटी जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय नागपूर येथे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

(ब ) दरकराराबाबत विहित अर्ज जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय , नागपूर येथून प्राप्त होईल.

(क) ज्यांच्याजवळ स्वतःचे नावावर दोन किंवा अधिक वाहने आहेत त्यांचे सदर वाहन हे दरपत्रक भरतेवेळी दहा वर्षाचे आतील नोंदणीकृत असावीत, त्यानीच दरपत्रक भरावी .

(ड ) दरपत्रक मंजूर झाल्यावर सात दिवसांच्या आत एकुण वार्षिक ठेकयाच्या रकमेच्या 3% रक्कम सुरक्षा ठेव म्हणून जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय ,नागपूर यांचे नावाने धनाकर्षाद्वारे ( डिमांड ड्राफ्ट) सादर करावी .

(ई ) दरकरार स्वीकरणे अथवा नाकरणे याबाबतचे सर्व अधिकार दरकरार समितीस राहतील . ठेकेदारांच्या कोणत्याही अटी स्वीकारण्यात येणार नाहीत.

### द्रवनत्र वाहतूक दरकरार 2025-26 साठी नियम व अटी

माल वाहतुक करणाऱ्या ठेकेदारांना सूचना करण्यात येते की, जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, नागपूर हे महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने दिनाक 1ऑक्टोबर 2025 ते 30 सप्टेंबर 2026 या कलावधीकरीत जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र नागपूर येथून भरलेली द्रवनत्रपात्रे सोबत घेऊन त्यांचा नागपूर जिल्हयातील उपकेंद्रांना दिनांक 1ऑक्टोबर 2025 ते 30 सप्टेंबर 2026 या कालावधीपर्यंत द्रवनत्र व वीर्यमात्रा पुरवठा करावयाचा आहे. त्याकरिता ईच्छूक वाहतुकदारांकडून मोहोरबंद दरपत्रके वाहतूक दर प्रति किलोमीटर प्रमाणे घ्यावा नियम व अटी खालीलप्रमाणे आहेत.

1) द्रवनत्र वाहतुकीचे दरपत्रक अर्ज, अटी व नियम जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, नागपूर यांचे कार्यालयातून शासकीय वेळेत दिनाक 1 सप्टेंबर 2025 ते दिनांक 10 सप्टेंबर 2025 दुपारी 2.00 वाजेपर्यंत उपलब्ध होऊ शकतील .

2) दरपत्रके मोहोरबंद असणे आवश्यक असून दरपत्रक पाकीटावर **"द्रवनत्र वाहतुकीसाठी दरपत्रक"** असे नमूद करावे. तसेच तांत्रिक लिफाफ्यावर **"तांत्रिक लिफाफा"** असे नमूद कारावे. दरपत्रके दिनांक 10 सप्टेंबर 2025 वार - बुधवार सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, नागपूर यांचे कार्यालयात स्वीकारण्यात येतील. त्यानंतर आलेली दरपत्रके स्वीकारल्या जाणार नाहीत. दरपत्रक पाकीटासोबत अनामत रक्कम रु. 10,000/- (दहा हजार रुपये) चा धनाकर्ष (Deamand Draft) जोडावा लागेल. संपूर्ण दरकरार प्रक्रिया ही दोन लिफाफा (तांत्रिक व व्यापारी) पध्दतीचा अवलंब करून पार पाडण्यात येईल .

जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
नागपूर